16 MAR 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



छत्रपती संभाजीनगर येथे शुक्रवारी इंद्रधनुष्य महोत्सवाचे उपविजेतेपद शिवाजी विद्यापीठाच्या संघाने पटकावले.

# 'इंद्रधनुष्य'मध्ये शिवाजी विद्यापीठ उपविजेता

## मुंबईला विजेतपद : शिवाजी विद्यापीठ संघाला शोभायात्रेसह तीस कलाप्रकारांत पारितोषिक

लोकमत न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर/ कोल्हापूर : गेल्या अनेक वर्षांपासून इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचे विजेतेपद जिंकण्याची परंपरा मुंबई विद्यापीठाने अबाधित राखली. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने अनपेक्षितपणे पुणे विद्यापीठाला मागे टाकून उपविजेतेपद जिंकून या स्पर्धेत मुसंडी मारली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'इंद्रधनुष्य राज्यस्तरीय युवक महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी पार पडला. या महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने शोभायात्रेसह विविध कलाप्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून उपविजेतेपदापर्यंत मजल मारली.

शिवाजी विद्यापीठाने या स्पर्धेत सांस्कृतिक शोभा यात्रा (प्रथम क्रमांक), स्थळ छायाचित्रण (प्रथम), स्थळ चित्रण (प्रथम), कातर काम (प्रथम) भारतीय समूहगीत (प्रथम), मातीकाम (द्वितीय), शास्त्रीय नृत्य - (द्वितीय), सुगम गायन (द्वितीय), पश्चिमात्य वाद्य वादन (द्वितीय), लघुपट (तृतीय), नाट्यगीत गायन (तृतीय), सांघिक रचनाकृती (तृतीय) आणि कला विभाग फिरता करंडक (सांघिक उपविजेते) अशी पारितोषिके मिळवली. विसावा इंद्रधनुष्य महोत्सव ३ ते ७ नोव्हेंबर दरम्यान अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे होणार आहे.

### कलाप्रकार निहाय उत्कृष्ट संघ

- चॅम्पियन ट्रॉफी (सर्वसाधारण विजेता संघ) : मुंबई विद्यापीठ
- रनर्सअप ट्रॉफी सर्वसाधारण उपविजेता संघ : चंद्रकांत यशवंत बांदेकर सर्वसाधारण उपविजेता संघ फिरते चषक द्वारा आदेश बांदेकर) : शिवाजी विद्यापीठ
- ललित कला विभाग उत्कृष्ट संघ - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 MAR 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मधमाश्या, कीटकांना आम्ही मारणार नाही

## शालेय विद्यार्थ्यांच्या भावना : प्रदर्शनाचा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित कीटक प्रदर्शनामुळे कीटकविश्वाकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन बदलला. यापुढे आम्ही कीटकांना, मधमाश्यांना मारणार नाही, तर त्यांना जगविणार, कारण ते जगले, तरच आपण जगू शकू, अशी भावना आज प्रदर्शनाच्या अखेरच्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

सिद्धांत खोत या विद्यार्थ्याने सांगितले, 'या प्रदर्शनामुळे माझा कीटकांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. पूर्वी मला त्यांची कीळस वाटायची आणि मी त्यांना मारून टाकायचो. आता मात्र मी कीटक मारणार नाही. त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी माझी आहे, हे मला समजले.' आर्या हडपल या विद्यार्थिनीने सांगितले, 'पर्यावरणामध्ये इतके वैविध्यपूर्ण कीटक, फुलपाखरे आहेत, हे मला पहिल्यांदाच समजले.' संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूलचे शिक्षक इंद्रजित थोरात म्हणाले, 'विद्यापीठाने या प्रदर्शनाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांनाही पर्यावरणविषयक जनजागृतीच्या कार्यात सहभागी करून घेतले, ही बाब राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी अत्यंत सुसंगत आहे. यापुढील काळातही असे विद्यार्थीभिमुख उपक्रम आयोजित केले जावेत.' पालक विद्या ताकवले म्हणाल्या, 'या प्रदर्शनामुळे केवळ मुलालाच नाही, तर मलाही अनोख्या कीटकविश्वाची ओळख झाली. कीटक आपल्या पर्यावरणातील महत्त्वाचे घटक आहेत. त्यांना जपायला हवे.'

या प्रदर्शनाला कोल्हापूर शहर, हेर्ले, उजळाईवाडी, तामगांव, पेठवडगांव, इचलकरंजी, गडहिंग्लज, कुंभोज, शिरोळ, निपाणी, चंदगड, जत, सांगली येथील शाळा-महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. तिन्ही दिवसांत मिळून पंधरा हजारांहून अधिक जणांनी प्रदर्शन पाहिले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कीटक प्रदर्शन पाहण्यासाठी शुक्रवारी शालेय विद्यार्थ्यांनी गर्दी केली.

### गेल्या ३५ वर्षांतील संशोधनाचे फलित

■ 'शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी गेल्या ३५ वर्षांत वन विभाग आणि जैवविविधता मंडळ यांच्या सौजन्याने संशोधनासाठी विविध कीटक परिसरातील निसर्गसंपदेमधून संकलित केले आहेत. भावी पिढीमध्ये या कीटकांविषयी जाणीवजागृती व्हावी म्हणून यामधील विविध प्रजातींच्या २२०० कीटकांचे प्रदर्शन मांडले असल्याचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी सांगितले.

16 MAR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबई विद्यापीठाला पुन्हा विजेतेपद

## इंद्रधनुष्य महोत्सव; आठ वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठ उपविजेता

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात इंद्रधनुष्य राज्यस्तरीय युवा महोत्सव रंगला. त्यात विजेतेपद जिंकण्याची परंपरा मुंबई विद्यापीठाने अबाधित राखली. शिवाजी विद्यापीठाच्या संघाने अनपेक्षितपणे पुणे विद्यापीठाला मागे टाकून आठ वर्षांनंतर उपविजेतेपदी मुसंडी मारली. या संघाने शोभायात्रेसह विविध कलाप्रकारांत प्रथम क्रमांक पटकविला.

या महोत्सवात शिवाजी विद्यापीठाने सांस्कृतिक शोभा यात्रा (प्रथम क्रमांक), स्थळ छायाचित्रण, स्थळ चित्रण, कातर काम, भारतीय समूहगीत (प्रथम), मातीकाम, शास्त्रीय नृत्य (द्वितीय), सुगम गायन, पश्चिमात्य वाद्य वादन (द्वितीय), लघुपट, नाट्यगीत गायन, सांघिक रचनाकृती (तृतीय) आणि



कोल्हापूर : छत्रपती संभाजीनगर येथील राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवा महोत्सवात उपविजेतेपद पटकावणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.

> या महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या ४० विद्यार्थी कलाकारांच्या संघाने केलेल्या धडाकेबाज कामगिरीमुळे तब्बल आठ वर्षांनी उपविजेतेपद मिळाले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील कलाकारांना नृत्य, गायन, वादन आदींचे दिग्दर्शन करण्याची संधी दिल्याचा चांगला फायदा झाला.
> **- डॉ. पी. टी. गायकवाड,** संचालक, विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग

कला विभाग फिरता करंडक (सांघिक उपविजेते) मिळविला. ललित कला विभाग उत्कृष्ट संघ ठरला. विद्यापीठाच्या संघाला चंद्रकांत यशवंत बांदेकर सर्वसाधारण उपविजेता संघ फिरता चषक देवून गौरविण्यात आले.

यावेळी कुलगुरु डॉ. विजय फुलारी, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, प्र-कुलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. डी. आर. मोरे, विद्यापीठ संघाचे प्रमुख डॉ. राजन अतिग्रे, सुरेखा आडके उपस्थित होते.

16 MAR 2024 · सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुरेल तानक्रियांनी मिळाली रसिकांना प्रसन्नतेची अनुभूती

## शाहू संगीत रजनी : कुबेर, चिपळूणकर यांचे शास्त्रीय गायन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : संवादिनीच्या मंजूळ सुरांना बिलगून येणारा व तबल्याच्या तालबद्ध ठेक्याशी हितगुज करीत येणाऱ्या सुरेल तानक्रिया, अलाप, हरकतींनी गाण वैशिष्ट्यांची सहज सुंदर मांडणी करीत शाहू संगीत रजनीचा दुसरा दिवसही कर्णमधुर झाला. ज्येष्ठ गायिका विदुषी अनुराधा कुबेर व युवा गायिका गौतमी चिपळूणकर यांच्या शास्त्रीय गायनाने रसिकांनी प्रसन्नतेची अनुभूती दिली.

येथील शिवाजी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र ललित कला विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या शाहू संगीत रंजनीची आज सांगता झाली. यात रसिकांनी शास्त्रीय गायनाचा आनंद



गौतमी चिपळूणकर.

घेतला. संगीत मैफलीच्या पहिल्या सत्रात युवा गायिका गौतमी चिपळूणकर यांनी शास्त्रीय गायन केले. यात राग गौड मल्हार गायला घेतला. विलंबित तिलवाडा तालात असलेली बंदिशी सादर केली. या बंदिशीचे 'काहे हो' बोल होते. त्यानंतर दृत तीन तालांतील 'सैय्या मोरा रे' ही बंदिशी गायली. सुरेल अलाप, तिन्ही सप्तकांत लिलया फिरणाऱ्या गौतमी यांच्या स्वर साजाने पंडित उल्हास कश्याळकर यांच्या गायकीची आठवण करून दिली. प्रशांत भौमिक यांनी तबला तर स्वरूप दिवाण यांनी संवादिनीची साथ केली.

दुसऱ्या सत्रात विदुषी अनुराधा कुबेर यांचे गायन झाले. राग मांझ खमाजमधील 'अचानक गहे व लिनो मोरी भैय्या' ही ठुमरी सादर केली. महेश देसाई यांनी तबला तर सौमित्र क्षीरसागर यांनी संवादिनी साथ केली. ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित विनोद डिग्रजकर यांच्या हस्ते कलावंतांचा सत्कार करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विनोद ठाकूर-देसाई व त्यांच्या सहकाऱ्यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2024
तरुण भारत

# अनुराधा कुबेर, गौतमी चिपळूणकर यांच्या शास्त्रीय गायनाने रसिक मंत्रमुग्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागच्यावतीने आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनी कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका विदुषी अनुराधा कुबेर व युवा गायिका गौतमी चिपळूणकर यांच्या गायानाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. शुक्रवारी सायंकाळच्या मैफलीत तालबद्ध बंदिशांना उपस्थितांनी चांगलीच दाद दिली.

पहिल्या सत्रात गौतमी चिपळूणकर यांनी राग गौड मल्हारने गायनाची सुरुवात केली. त्यांना तबला साथ प्रशांत भौमिक यांनी व हार्मोनिअमची साथ स्वरूप दिवाण याने केली. थर दुसऱ्या सत्रात


अनुराधा कुबेर


गौतमी चिपळूणकर

गायिका विदुषी अनुराधा कुबेर यांना तबलासाथ पं. महेश देसाई तर हार्मोनिअम साथ सौमित्र क्षीरसागर यांनी केली. ज्येष्ठ गायक पं. विनोद डिग्रजकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र.–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील आदी उपस्थित होते.

16 MAR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बंदिशी, ठुमरीच्या मैफलीने राजर्षी शाहू संगीत रजनीची सांगता

## कुबेर, चिपळूणकर यांच्या शास्त्रीय गायनाला रसिकांची भरभरून दाद : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कामोद, जोग आणि झिंझोटी अशा रागांमधील बंदिशी आणि ठुमरीने पुण्यातील भेंडी बाजार घराण्याच्या सुप्रसिद्ध गायिका विदुषी अनुराधा कुबेर यांच्या शास्त्रीय गायनाने शुक्रवारी राजर्षी शाहू संगीत रजनीची सांगता झाली. तत्पूर्वीच्या पहिल्या सत्रात युवा गायिका गौतमी चिपळूणकर यांनी या मैफलीत रंग भरला. तबला, संवादिनीच्या साथीने उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या दोन्ही मैफलींना कोल्हापुरातील अनेक संगीत रसिकांनी भरभरून दाद दिली.



अनुराधा कुबेर



गौतमी चिपळूणकर

येथील राम गणेश गडकरी सभागृहात शिवाजी विद्यापीठाच्या संगीत आणि नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित ही शाहू संगीत रजनी पार पडली. दुसऱ्या सत्रात अनुराधा कुबेर यांनी राग कामोदमधील हूं तो ज़न मन छांडी ही विलंबित बंदिश सादर केली. पाठोपाठ राग जोगमध्ये भेंडीबाजार घराण्याचे उस्ताद अमान अली खां यांच्या ताल रूपक वे तीन तालमधील बंदिशी, नंतर राग झिंझोटीमध्ये पतिदेवन महादेव ही बंदिशी सादर करून राग मांझ खमाजमधील अचानक गहेलिनो मोरी बैय्या ही दुसरी ठुमरी सादर केली. पं. विनोद डिग्रजकर यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. कोल्हापुरातील प्रसिद्ध तबलावादक पं. महेश देसाई यांनी तबल्यावर आणि सौमित्र क्षीरसागर यांना हार्मोनियमवर साथ केली. तत्पूर्वी पहिल्या सत्रात गौतमी चिपळूणकर यांनी गौड मल्हार रागातील काहो होही विलंबित तिलवाडा तालात निबद्ध बंदिशी सादर केली. दृत तीनतालातील सैय्या मोरो रे या बंदिशीने तिने मैफलीचा शेवट केला. तबल्यावर प्रशांत भौमिक आणि संवादिनीवर स्वरूप दिवाण यांनी साथ केली. या कलाकारांचा डॉ. अ. ल. नागावकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. विनोद ठाकूर देसाई यांनी प्रास्ताविक केले. अतुल परीट यांनी आभार मानले. मनीष आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

16 MAR 2024 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बारावीनंतर फिल्म मेकिंग कोर्स

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रथमच बी. ए. फिल्म मेकिंग हा बारावीनंतरचा तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू होत आहे. चित्रपटांशी संबंधित असलेला कॅम्पसमधील हा पहिलाच अभ्यासक्रम असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी होत आहे.



कोल्हापूरला चित्रपट क्षेत्राचा मोठा वारसा आहे. अनेक दिग्गज निर्माते, दिग्दर्शक आणि कलाकारांनी देशाच्या चित्रपटसृष्टीत मोठे योगदान दिले आहे. तथापि, चित्रपट विषयाचे शास्त्रीय प्रशिक्षण आतापर्यंत उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना पुणे किंवा मुंबईला जावे लागत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पुढाकार घेऊन चालू शैक्षणिक वर्षापासून चित्रपटविषयक अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार हा अभ्यासक्रम तयार झाला असून, लवकरच त्याची अंमलबजावणी होत आहे. यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांसोबत बाहेरील विद्यार्थ्यांना चित्रपटाचा शास्त्रीय अभ्यास करणे शक्य होणार आहे.

बारावी पास असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली असून थेअरी आणि प्रात्यक्षिकांवर आधारित हा अभ्यासक्रम आहे. चित्रपट जगताशी संबंधित तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. अत्यंत कमी शुल्कात विद्यार्थ्यांना पूर्णवेळ अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. शिवाय नियमानुसार वसतिगृहाची सुविधा मिळणार आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2024

Times of India

# Researchers at SUK get patent for unique device

Rahul.Gayakwad
@timesgroup.com

Kolhapur: Three researchers from Shivaji University Kolhapur (SUK) received a patent from the govt on Thursday for inventing a device that makes solar energy-producing materials through the arrested precipitation technique.

SUK researchers Dr P N Bhosale and Dr Rahul Mane from the chemistry department and Dr Kishorkumar Khot from the nano-science and biotechnnology department, developed the device which requires low cost of chemicals and equipments. The researchers also claim it would reduce the cost of solar equipments by 50%.

They had applied for a patent at the patent certification office of central govt on Feb 26, 2022. They received the patent after nearly two years.

Dr P N Bhosale is currently working as a UGC BSR (basic scientific research) faculty fellow. Dr Kishorkumar Khot is working as an assistant professor at school of nano science and biotechnology. While Dr. Rahul Mane is working as assistant professor for the last 12 years in the industrial chemistry department.

Dr Rahul Mane said, "To create a solar energy equipment, several smaller materials are required. This device is environment friendly. Our main agenda behind this device is to reduce the cost of solar equipments. If the device is affordable and easy to handle, then farmers and other people will tend to use this solar device on a large scale."

The scientists received guidance from SUK vice-chancellor Dr D T Shirke, pro vice-chancellor Dr P S Patil, registrar Dr V N Shinde, head of department of chemistry Dr K D Sonwane, coordinator of industrial chemistry Dr Gajanan Rashinkar.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2024
तरुण भारत

# भक्ती बाटेचे नेट-जीआरएफ परिक्षेत यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या




रसायनशास्त्र अधिविभागातील भक्ती बाटेने जून २०२३ मधील सीएसआयआर - नेट परीक्षेत ऑल इंडिया रँक ६५ मिळविला आहे. ती रसायनशास्त्र अधिविभागातून एम. एस्सी ऑरगॅनिक केमिस्ट्रि विषयातून पदव्युतर पदवी उत्तीर्ण आहे.

फुलेवाडीतील मध्यमवर्गीय कुटुंबातील भक्तीने यश प्राप्त केल्याने तिचे कौतुक होत आहे. परीक्षेसाठी एकूण ४४ हजार ४९९ विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये भक्तीचा एआयआर ६५ इतका आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2024

लोकमत



डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस रिसर्च सेंटरला डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी प्रा. आरिफ शेख व विद्यार्थी उपस्थित होते.

# आयडियाथॉनमध्ये 'डीवायपी टेक्निकल सेंटर' अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कसबा बावडा :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या आयडियाथॉन स्पर्धेमध्ये तळसंदे येथील डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस रिसर्च सेंटरने जनावरांमधील कृत्रिम रेतनासाठी तयार केलेल्या उपकरणाने अव्वल स्थान पटकावले. याबाबतच्या पुढील संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाकडून सीड फंडिंग केले जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. विभागप्रमुख प्रा. आरिफ शेख यांच्या सिमेंन थावर युनिटला या स्पर्धेत प्रथम क्रमांक, तर अँटी रोड हिप्नॉयसिस कॅप (शिव कवच) या संशोधनाला तृतीय क्रमांकाने गौरविले. या संशोधनासाठी सहायक म्हणून कॉम्प्युटर विभागातील तृतीय वर्षाच्या साक्षी मेनकर, निहाल शेख व ललित टेकाळे यांचा सहभाग होता.

प्रथम क्रमांक मिळालेल्या संशोधनाचा विषय हा ॲनिमल हजबंडरी डिपार्टमेंट (महाराष्ट्र शासन)कडून आलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंटवर होता. या संशोधनानंतर दोन युनिट तयार केली असून, पहिले युनिट हे पशुवैद्यकीय अधिकारी सहजपणे वापरू शकतील, असे सौर ऊर्जेवर चालणारे उपकरण आहे, तर दुसरे युनिट हे प्रयोगशाळा उपकरण असेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2024
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याकडून प्रथम क्रमांकाचा सन्मान स्वीकारताना प्रा. आरिफ शेख व विद्यार्थी.

# डी. वाय. टेक्निकल कॅम्पस 'आयडियाथॉन'मध्ये अव्वल

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठातर्फे घेतलेल्या 'आयडियाथॉन' स्पर्धेमध्ये तळसंदे येथील डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस रिसर्च सेंटरने जनावरामधील कृत्रिम रेतनासाठी तयार केलेल्या उपकरणाने अव्वल स्थान पटकावले. याबाबतच्या पुढील संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाकडून सीड फंडिंग केले जाणार आहे.

डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचे प्रा. आरिफ शेख यांच्या सिमेन थावर युनिटला या स्पर्धेत प्रथम क्रमांक तर अँटी रोड हिप्नॉयसिस कॅप (शिव कवच) या संशोधनाला तृतीय क्रमांक मिळाला. संशोधनासाठी सहाय्यक म्हणून कॉम्प्युटर विभागातील तृतीय वर्षाच्या साक्षी मेनकर, निहाल शेख व ललित टेकाळे यांचा सहभाग होता. याच स्पर्धेत प्रा. शेख यांनी तयार केलेल्या अँटी-रोड संमोहन कॅप (शिवकवच) या संशोधनला तृतीय क्रमांकाने गौरविले. टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. सतीश पावसकर यांचे मार्गदर्शन व शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. आर. एस. पवार, डॉ. विशाल सूर्यवंशी, विभागप्रमुख प्रा. उमेश पाटील यांचे सहकार्य मिळाले.

16 MAR 2024

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# डी.वाय.पाटील रिसर्च सेंटरचे यश

## आयडियाथॉन स्पर्धेत टेक्निकल कॅम्पसने पटकाविले अव्वल स्थान

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या आयडियाथॉन स्पर्धेमध्ये तळसंदे येथील डी.वाय.पाटील टेक्निकल कॅम्पस रिसर्च सेंटरने जनावरामधील कृत्रिम रेतनासाठी तयार केलेल्या उपकरणाने अव्वल स्थान पटकावले आहे. याबाबतच्या पुढील संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाकडून सीड फंडिंग केले जाणार आहे.

डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचे हेड आरिफ शेख यांच्या सिमेन थावर युनिटला या स्पर्धेत प्रथम क्रमांक तर अँटी रोड हिप्नॉयसिस कॅफ(शिवकवच) या संशोधनाला तृतीय क्रमांकाने गौरविण्यात आले. या संशोधनासाठी सहाय्यक म्हणून कॉम्प्युटर



मान्यवरांच्या हस्ते सत्कार स्विकारताना प्रा.अरिफ शेख व सहभागी विद्यार्थी साक्षी मेनकर, निहाल शेख, ललित टेकाळे.

विभागातील तृतीय वर्षाच्या साक्षी मेनकर, निहाल शेख, ललित टेकाळे यांचा सहभाग होता.

प्रथम क्रमांक मिळालेल्या संशोधनाचा विषय हा ऍनिमल हसबंडरी डिपार्टमेंट (महाराष्ट्र शासन) कडून आलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर होता.या संशोधनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आपल्या जनावरे माजावर येण्याच्या काळात त्याला योग्य पद्धतीने कृत्रिम रेतन देण्यासाठी या उपकरणांची मदत होणार आहे. या उपकरणासाठी भारत सरकारकडून पेटंटही प्राप्त झाले आहे. या संशोधनानंतर दोन युनिट तयार करण्यात आली असून पहिले युनिट हे पशुवैद्यकीय अधिकारी सहजपणे वापरू शकतील असे सौर उर्जेवर चालणारे उपकरण आहे तर दुसरे युनिट हे प्रयोगशाळा उपकरण असेल. याच स्पर्धेत प्रा. शेख यांनी तयार केलेल्या अँटी-रोड संमोहन कॅप (शिवकवच) या संशोधनाला तृतीय क्रमांकाने गौरविण्यात आले. हे उपकरण संपूर्णपणे स्वयंचलित असून वाहन चालविताना चालकाला झोप येऊ देत नाही. जरी चालक झोपेच्या अधीन होत असेल तर त्याला पुर्णपणे जागे करण्याचे काम अँटी-रोड संमोहन कॅप करते. या रिसर्च प्रोजेक्टसाठी टेक्निकल कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. सतीश पावसकर यांचे मार्गदर्शन व शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक आ.एस.पवार, डॉ.विशाल सूर्यवंशी व विभाग प्रमुख प्रा. उमेश पाटील यांचे सहकार्य लाभले.